तात्काळ



सत्यमेव जयते

विधान भवन
बॅकबे रेक्लमेशन
विधान भवन मार्ग
मुंबई ४०० ०३२

तारेचा पत्ता : विधानमंडळ
दूरध्वनी क्र. : २२०२ ७३ ९९
फॅक्स क्रमांक : २२०२ ४५ २४

# महाराष्ट्र विधानमंडळ

क्रमांक ३२३९/म.वि.स./३१
दिनांक 24 FEB 2022

प्रेषक :

**प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति :

**सचिव,**
महाराष्ट्र शासन,
संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

**विषय : विविध महामंडळांचे अहवाल यांची ऑनलाईन लिंक विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत...**

**महोदय,**

उपरोक्त विषयासंदर्भात निदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, विविध महामंडळांचे अहवाल वित्त विभाग क्रमांक शासाउ १०१२/ प्र.क्र.२४/साउ, दिनांकित ३० जुलै, २०१२ च्या शासन निर्णयानुसार विधानमंडळास पुस्तिका व सी.डी.स्वरुपात सादर करण्यात येतात.

विधानमंडळाचे कामकाज कागद विरहित (Paperless) करण्याच्यादृष्टीने सदरहू अहवाल विधानमंडळाच्या सन्माननीय सदस्यांना विधानमंडळ सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येतात.

अत: **विविध महामंडळांच्या वार्षिक अहवालांच्या बाबतीत फक्त आवश्यक अभिलेख्यापुरत्या दहा प्रती व दोन सी.डी. स्वरुपात उपलब्ध कराव्यात तसेच ऑनलाईन लिंक विधिमंडळ सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावी,** याबाबत मंत्रालयीन सर्व विभागांना व राज्य सार्वजनिक उपक्रमांना कृपया आपल्या स्तरावर कळविण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(घ.ज्ञा.देबडवार)
अवर सचिव,(समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

\\Mls-a-002\d\Data\Rohan\2022\Ahwal Note.docx